# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 03/02/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### घरफोडी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत सुकडी बेलदार MIDC बोरी येथे दिनांक ०१/०२/२०२३ चे २०.०० वा. ते ०२/०२/२०२३ चे ०७.०० वा. चे दरम्यान फिर्यादी नामे— अतुल विठठलराव वाडिघरे, वय ४० वर्षे, रा. सुकळी बेलदार ता. हिंगणा जि. नागपुर हे आपल्या पत्नी व मुलाबाळासह राहत असुन गॅरेजचे काम करतात. सुकडी गावात जाणारा कच्च्या रोडवर ॲटोमोबाईल रिपेरिंगचे दुकान चालवितो. फिर्यादीचे दुकानात मोटारसायकल व सायकलचे टायर टयुब तसेच चिल्लर सामान विक्रीसाठी ठेवतो. फिर्यादी हे दुकान बंद करून ताला लावुन घरी गेले व जेवन करून घरीच झोपले दि.०२/०२/२३ रोजी सकाळी ०७.०० वा दुकान उघडण्याकरीता आले असता दुकानाला लावलेला ताला दिसला नाही व दुकानाचे दार तुटलेले दिसले फिर्यादीने आत जावुन पाहीले असता दुकानातील विक्रीस ठेवलेले मोटरासायकलचे ०८ नग नविन टायर किंमती अंदाजे १०००/—रू, ॲक्टीवाचे ०२ नग नविन टायर किंमती अंदाजे ७००/— रू व टायर खोलण्यासाठी लागणारे दुकानातील मोठे पान्हे ०४ नग अंदाजे २०० नग असा एकुण ११,७००/—रूपयाचा मुद्देमाल रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने दुकानाचा ताला तोडुन दार तोडुन आत प्रवेश चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. १५५ तिवारी हे मो. नं. ९९२३२६१५५७ करीत आहे.

### जबर दुखापत

**पो.स्टे. कुही** :— अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा तितुर येथे दिनांक ०२/०२/२०२३ चे १२.३० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— सुरज श्रावण काकडे, वय २७ वर्ष, रा. तितुर व जखमी फिर्यादी हे एकाच गावाचे रहीवासी असुन नमुद घटना वेळी व ठिकाणी गावातील सोनिराम शिंदे मेश्राम याने आरोपीला म्हटले की, तु राजु वांढरे पैसे दिले का यावरून आरोपी याने जखमी यास शिवीगाळ करून गावातील एका दुकानात जावुन तेथे ठेवलेला लोखंडी पाईप उचलुन जखमी याचा पाठीवर उजव्या हातावर व डोक्यावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शितल नामदेव वांढरे वय 47 वर्ष रा. तितुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३२६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मंडवाले मॅडम मो. नं. ९७६३२३४५४८ या करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल :– दिनांक ३१/१/२०२३ चे ०४.०० वा. दरम्यान पो.स्टे. काटोल हद्यीत फिर्यादी यांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही फिर्यादी हे बाथरूम करायला उठले असता घरी दिसून आली नाही. तिचा ईतरत्र नातेवाईकांकडे शोध घेतला असता मिळून आली नाही. मुलीला कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावून पळवून नेलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ३९८ भुषन मदनकर पो स्टे काटोल हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत दिनांक ०१/०२/२०२३ चे ०८.०० वा. नंतर दरम्यान यातील **मृतक नामे– अमोल लहानुजी रंगारी, वय 45 वर्षे रा गौंडखैरी** यास १५ वर्षापासुन मुलबाळ होत नंसल्याने याच त्रासाला कंटाळुन घटना ता वेळी गौंडखैरी शिवारातील रत्नमाला डागा याचे पडीत शेतातील विहीरीमध्ये जावुन विहीरीत उडी घेवुन पाण्यात बुडुन आत्महत्या केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुधिर लहानु रंगारी, वय ४० वर्ष, बिडगाव यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार उईके पो.स्टे. कळमेश्वर हे मो. नं. ९८२३३२४८२६ करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर